महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग, मंत्रालय
५ वा मजला (मुख्य), मादाम कामा रोड, हुतात्मा चौक,
मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्रमांक ०२२ २२७९३६१०
क्रमांक इएसटी २०२०/प्र.क्र १९६/का. २

Email lrjd desk2@mah.gov.in
दिनांक ३ जुलै, २०२६

प्रति,
वरिष्ठ सहायक संचालक (जाहीरात प्रकाशन),
माहीती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासकिय भवन, १७ वा मजला,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

विषय:- विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे सेवानिवृत्त प्रारुपकार-नि-सह सचिव व लघुलेखक (उच्चश्रेणी/निम्नश्रेणी) (इंग्रजी) संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

महोदय,

विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे एका सेवानिवृत्त प्रारुपकार-नि सह सचिव व दोन लघुलेखक (उच्चश्रेणी/निम्नश्रेणी) (इंग्रजी) संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १० ०६.२०२५ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधिन राहून करार पद्धतीने नियुक्ती करण्याचे प्रस्तावित आहे याबाबतच्या सूचनेचा / जाहिरातीचा विहित नमूना सोबत जोडला आहे ही सूचना सर्वाधिक खपाच्या दोन स्थानिक मराठी वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याची आपणस विनंती करण्यात येत आहे.

सदर सूचना/ जाहिरात दि.०७/७/२०२६ पर्यंत प्रसिध्द करण्यात यावी.

या जाहिरातीची देयके आहरण व संवतिरण अधिकारी तथा कार्यासन अधिकारी (कार्यासन २०), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्या नावाने पाठविण्यात यावे.

आपला,

(संजय खेडेकर)
उप सचिव (प्रशासन)

सहपत्र :- वर नमूद सूचना/जाहिरात (७ प्रती)

प्रति,

कार्यासन अधिकारी (कार्यासन-७), विधि व न्याय विभाग, मुंबई यांच्याकडे सदर सूचना / जाहिरातीची माहिती विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याच्या विनंतीसह अग्रेषित.

प्रारुपकार-नि-सह सचिव व लघुलेखक (वरिष्ठ स्वीय सहायक/ निवडश्रेणी/ उच्चश्रेणी/ निम्नश्रेणी) (इंग्रजी) या संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची एक वर्षाकरिता विधि व न्याय विभाग (खुद्द), मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

<u>विभागाची आवश्यकता</u> :

प्रारुपकार-नि-सह सचिव व लघुलेखक (वरिष्ठ स्वीय सहायक/ निवडश्रेणी/ उच्चश्रेणी/ निम्नश्रेणी) (इंग्रजी) या संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची एक वर्षाकरिता खालील पदसंख्येच्या मर्यादेत विधि व न्याय विभाग (खुद्द), मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

अ. क्र.	संवर्ग	विभागास आवश्यक असलेली पद संख्या	विवक्षित कामाचे स्वरूप
१			
१	सेवानिवृत्त प्रारुपकार-नि-सह सचिव	१	i) मा.मुंबई उच्च न्यायालय, जनहित याचिका क्र.०७/२०११ मधील आदेशानुसार महाराष्ट्र अधिनियम Real Time Updation करुन ते विधि व न्याय विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. ii) मा.दिल्ली उच्च न्यायालय याचिका क्र.४७६१/२०१६ मधील आदेशानुसार केंद्र सरकार द्वारे पुरस्कृत केलेल्या indiacode.nic या संकेतस्थळावर भारतातील सर्व राज्यातून त्या-त्या राज्यांचे सर्व अधिनियम, अध्यादेश, अधिसूचना, आदेश इ.उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. iii) विभागाच्या lj.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर आणि केंद्र शासनाच्या indiacode.nic.in या संकेतस्थळावर अपलोड केलेल्या अधिनियमाच्या pdf. या OCR या स्वरूपात व mapping करुन केंद्र शासनाच्या india code च्या पोर्टलवरील नमुन्यामध्ये उपलब्ध करुन देणे याकरिता पूर्ण जबाबदारी देण्यात येईल. त्यानुषंगाने या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
२	सेवानिवृत्त लघुलेखक (वरिष्ठ स्वीय सहायक/निवडश्रेणी/ उच्चश्रेणी/निम्नश्रेणी) (इंग्रजी)	२	विधि व न्याय विभागात प्रामुख्याने विधि विषयक (इंग्रजी) कामकाज हाताळले जाते. याकरिता टंकलेखन/लघुलेखन (इंग्रजी) यामध्ये निष्णांत असणे आवश्यक आहे.

अटी व शर्ती :-

१) सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १०.०६.२०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार एक वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात येणार आहे.

२) मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या कक्ष अधिकारी या पदावरुन सेवानिवृत्त झालेला अधिकारी / कर्मचारी असावा. सेवानिवृत्त कर्मचारी शारिरीक , मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा,तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३) उमेदवारास कक्ष अधिकारी या पदावरील किमान ३ ते ५ वर्षाचा अनुभव असावा.

४) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

५) उमेदवाराचे वय ६९ वर्षापेक्षा अधिक नसावे.

६) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्हयात राहणारा असावा.

७) आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त कर्मचाऱ्याने सदर पदाकरिता सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहून अथवा टंकलेखित करुन अर्ज सादर करावा.

८) उमेदवाराने त्यांचे अर्ज सदर पदाकरिता वेबसाईट वरील माहिती पाहून https://lj.maharashtra.gov.in lnjd-desk2@mah.gov.in या मेल आयडीवर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत करावेत. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

९) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

१०) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबत संपुर्ण अधिकार विभागाचा राहील.

११) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांस विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल.

१२) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीस कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय /वित्तीय अधिकार नसतील, अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र/आदेश इ. वर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

१३) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण-सीबीई १५२५/प्र.क्र. ३७/आस्थामं (का.१३),दिनांक १०.०६.२०२५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

-------x------

अर्जाचा नमुना

प्रारुपकार-नि-सह सचिव व लघुलेखक (वरिष्ठ स्वीय सहायक/ निवडश्रेणी/ उच्चश्रेणी/ निम्नश्रेणी) (इंग्रजी) या संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची एक वर्षाकरिता विधि व न्याय विभाग (खुद्द), मंत्रालय, मुंबई येथे करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

अर्जदाराचे अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे

१) अर्जदाराचे संपुर्ण नाव :-.....

२) अर्जदाराचा पत्ता :- .....

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :- .....

४) भ्रमणध्वनी क्रमांक :-.....

५) जन्म दिनांक व वय :-.....

६) विभागास आवश्यक अर्हता :-.....

७) अनुभव :-.....

.....

८) विधि व न्याय विभागाच्या संकेतस्थळावर दि. _____ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने या पदासाठी मी काम करण्यास इच्छुक असून सा.प्र.वि. शा.नि.दिनांक १०.०६.२०२५ मधील व जाहिरातीतील / सुचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

९) आवश्यक कागदपत्रे सोबत जोडली आहेत.

ठिकाण :-
दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी